ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार | दि. 29 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इराण युद्धानंतर डोनाल्ड ट्रम्प यांची आता 'ओमान'ला थेट धमकी




पान 2 वरुन...
पुण्यात 'डबल डेकर ट्विन टनल'!

### मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देताना सिद्धरामय्या भावुक; कर्नाटकमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी

# कर्नाटकात खांदेपालट!

महाईन्यूज | कर्नाटक

**गेल्या काही दिवसांपासून कर्नाटकमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी सुरू होत्या. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचंही बोललं जात होतं. या घडामोडीनंतर अखेर आज कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला असून आता डी.के.शिवकुमार यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदी वर्णी लागणार असल्याची चर्चा आहे.**



सिद्धरामय्या यांनी गुरुवारी (२८ मे) सकाळी एक महत्त्वपूर्ण 'ब्रेकफास्ट मीटिंग' आयोजित केली होती. त्या मीटिंगमध्येच सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसमोर राजीनामा देण्याची घोषणा केली होती. यावेळी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के.शिवकुमार हे देखील उपस्थित होते. या घोषणेनुसार, आज दुपारी सिद्धरामय्या यांनी लोकभवनमध्ये दाखल होत मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे.

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत हे लोकभवनमध्ये उपस्थित नसल्यामुळे सिद्धरामय्या यांनी राज्यपालांचे सचिव प्रभू शंकर यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला आहे. राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्या यांनी पत्रकार परिषद घेत सविस्तर भाष्य केलं. 'मी माझा शब्द पाळला आहे', असं सांगत आपण राष्ट्रीय राजकारणात जाण्यास इच्छुक नसल्याचंही सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे काँग्रेसची राज्यसभेची ऑफर सिद्धरामय्या यांनी नाकारली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### काँग्रेसची राज्यसभेची ऑफर नाकारली?

सिद्धरामय्या यांनी आज मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच सिद्धरामय्या यांनी काँग्रेस हायकमांडच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. दरम्यान राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्या राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चा होत्या. तसेच काँग्रेस हायकमांडनेही सिद्धरामय्या यांना राज्यसभेची ऑफर दिल्याची माहिती समोर आली होती. मात्र, काँग्रेसची राज्यसभेची ऑफर सिद्धरामय्या यांनी नाकारली आहे. याबाबत बोलताना सिद्धरामय्या म्हणाले की, "काँग्रेस पक्षाच्या हायकमांडच्या सूचनेनुसार मी राजीनामा दिला आहे. तसेच मी पक्षाच्या हायकमांडला सांगितलं आहे की मला राज्यसभेत जायचं नाही. मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत कर्नाटकच्या राजकारणात राहीन."

### सिद्धरामय्या काय म्हणाले?

"काँग्रेस पक्षाच्या हायकमांडने मला राजीनामा देण्यास सांगितलं, त्यानुसार मी आज माझा राजीनामा सादर केला आहे. मला खात्री आहे की जेव्हा राज्यपाल लोकभवनमध्ये येतील, तेव्हा ते राजीनामा स्वीकारतील. कारण संविधानानुसार हे करणं आवश्यक आहे. आमच्याकडे पूर्ण बहुमत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना (सरकार स्थापन करण्याची) परवानगी देणं घटनात्मक आहे. तसेच मला मुख्यमंत्री पदाची संधी दिल्याबद्दल सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचं मी मनःपूर्वक आभार मानतो. आम्ही जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी काम केलं आहे. २०१३ मध्ये आम्ही १६३ आश्वासनं दिली होती. त्यापैकी आम्ही १५८ आश्वासनं पूर्ण केले आहेत. २०२३ मध्ये आम्ही ५५० पेक्षा जास्त आश्वासनं दिली होती. त्यापैकी आम्ही जवळपास ३०० आश्वासनं पूर्ण केली आहेत. याशिवाय आम्ही ५ हमी योजना जाहीर केल्या आहेत, ज्या आम्ही पहिल्याच वर्षात पूर्ण केल्या आहेत", असंही सिद्धरामय्या यांनी यावेळी स्पष्ट केलं.

# पुण्यात 'डबल डेकर ट्विन टनल'!

## येरवडा ते कात्रजदरम्यान उभारणी; लवकरच आराखडा तयार करणार

**महाईन्यूज । पुणे**

**कात्रज ते येरवड्यादरम्यानच्या भूमिगत रस्त्याचा आराखडा अंतिम टप्प्यात पोहोचला असून, जमिनीवरील दुहेरी उड्डाणपुलाप्रमाणेच भूगर्भात दोन स्तरांचा भूमिगत मार्ग (डबल डेकर ट्विन टनेल) निर्माण करण्याची योजना तयार आहे. येरवडा-कात्रजसह एकूण ५४ किलोमीटरच्या भुयारी रस्त्यासाठी ३६,४१५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ५४ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागेल, असा प्राथमिक अंदाज आहे. या भुयारी मार्गांमध्ये आपत्कालीन स्थितीत सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी पर्यायी मार्गांचा विचार (एस्केप रूट) असतील.**



'मोनार्क सर्व्हेअर्स अँड इंजिनीअरिंग कन्सल्टन्सी' यांनी तयार केलेल्या या आराखड्यात वाहतुकीची सद्यस्थिती, भविष्यात होणारी वाहतूक वाढ, बोगद्याचे पर्याय, आर्थिक व्यवहार्यता आणि निधीची उपलब्धता यावर सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. ही सर्व माहिती राज्य सरकारला सादर करण्यात आली असून, या प्रकल्पासाठी विशेष उद्देश वहन (एसपीव्ही) स्थापना करण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका निवडणूक प्रचारात केलेल्या घोषणेनंतर या भुयारी मार्गासाठी एकेक पाऊल पुढे टाकले जात आहे.

सल्लागार संस्थेने या अभ्यासासाठी पुण्यातील ४५ ठिकाणी २४ तास वाहनांची मोजणी, वळण घेणाऱ्या वाहनांची संख्या, प्रवास चालू आणि प्रवास बंद होणारी प्राधान्याची ठिकाणे, अशा विविध प्रकारची सर्वेक्षण केली आहेत. त्यावर आधारित 'ट्रॅफिक मॉडेलिंग' करण्यात आले. वैभव टॉकीज-हडपसर, हॅरिस ब्रिज, शनिवारवाडा, गणेशखिंड रस्ता, खराडी बायपास यांसारख्या ठिकाणी प्रचंड वाहतुकीचा ताण असल्याचे या अभ्यासात आढळले आहे. सल्लागार संस्थेने केलेल्या अभ्यासात सात संभाव्य बोगद्यांचा विचार करण्यात आला आहे. त्यापैकी 'येरवडा-खडी मशिन' हा उत्तर-दक्षिण पुण्याला जोडणारा प्राधान्य मार्ग म्हणून निश्चित केला आहे. त्याशिवाय, 'जगताप डेअरी-सिंहगड रस्ता' आणि 'येरवडा-हिंजवडी' हे मार्गही प्रस्तावित आहेत.

अहवालानुसार हा प्रकल्प 'बांधा वापरा हस्तांतरित करा' (बीओटी) पद्धतीने राबविण्याचा विचार असून, ४० वर्षांचा कालावधी प्रस्तावित आहे. हा निधी इक्विटी, कर्ज आणि सरकारी अनुदानाद्वारे उभा करण्याचे 'मॉडेल' अहवालात सुचविण्यात आले आहे. मात्र, हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ३७ टक्के 'व्हायबिलिटी गॅप फंडिंग' आवश्यक आहे, असेही अहवालात म्हटले आहे.

### अवघ्या सात मिनिटांत प्रवास

या अहवालानुसार, बोगद्यांच्या जाळ्यामुळे रस्त्यांवरील वाहतुकीत १५ ते २२ टक्के घट होईल, असा दावा करण्यात आला आहे. येरवडा ते हिंजवडी हा सध्याचा ७५ मिनिटांचा प्रवास केवळ १६ मिनिटांत पूर्ण होऊ शकतो. तर, जगताप डेअरी ते कोथरूड हा प्रवास ६५ मिनिटांवरून अवघ्या सात मिनिटांवर येईल, असे नमूद करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी १७.६ मीटर व्यासाचा 'डबल डेकर टनेल' सुचविण्यात आला असून, एकाच बोगद्यात दोन्ही दिशेची वाहतूक सुरू ठेवता येणार आहे. त्यामुळे भूसंपादन कमी होईल आणि पर्यावरणीय परिणामही मर्यादित राहतील, असेही नमूद आहे.

# अखेर ठरलं! हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोसाठी आता 'आठवा' मुहूर्त

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा सुरू होण्याची पुणेकरांना प्रतीक्षा असून, आधी सात मुहूर्त हुकल्यानंतर आता या सेवेसाठी आठवा मुहूर्त काढण्यात आला आहे. हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारी ही मार्गिका आहे. या मेट्रोमुळे आयटी कर्मचाऱ्यांसह लाखो पुणेकरांचा प्रवास सुकर होणार आहे. ही सेवा सुरू झाल्यानंतर त्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.**



शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो ही पुण्यातील तिसरी मेट्रो मार्गिका आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड कंपनीसमवेत राबविण्यात येत आहे. ही सेवा गेल्या वर्षी मार्च महिन्यात सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, काम अपूर्ण असल्याने ती सुरू झाली नाही. त्यानंतर अनेक मुहूर्त जाहीर करण्यात आले; परंतु गेल्या सव्वा वर्षात ही सेवा सुरू होऊ शकलेली नाही. अलीकडे हिंजवडी ते बाणेरदरम्यान १२ स्थानकांपर्यंत १५ जूनपासून सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले. आता हे नियोजनही शक्य न झाल्याने ही सेवा जुलै महिन्यात म्हणजेच पावसाळ्यात सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

'पीएमआरडीए'तील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या मेट्रो मार्गिकेचे काम ९५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झालेले आहे. हिंजवडीपासून बाणेरपर्यंतच्या मेट्रो स्थानकांची कामे वेगाने सुरू आहेत. या मार्गिकेची तपासणी करण्यासाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना पत्र लिहिण्यात आले होते. त्यांच्याकडून या महिन्याच्या अखेरची वेळ तपासणीसाठी मिळाली आहे. त्यामुळे मेच्या अखेरीस आणि जून महिन्याच्या सुरुवातीला ही तपासणी होईल. या तपासणीनंतर आयुक्तांकडून मेट्रो सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यास महिनाभराचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे जुलैमध्ये मेट्रो सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. मात्र, जुलैमध्ये ती कधी सुरू होईल, याची वेळ निश्चित करण्यात आलेली नाही.

### मुख्यमंत्र्यांचे आश्वासन फोल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात यंदा मार्चमध्ये झालेल्या कार्यक्रमात ही मेट्रो सेवा दोन टप्प्यांत सुरू करण्याचे जाहीर केले होते. पहिला टप्पा मे महिन्यात आणि दुसरा टप्पा जुलैमध्ये सुरू होईल, असे आश्वासन त्यांनी दिले होते. हे दोन्ही मुहूर्त हुकले असून, त्यानंतर आता जुलैमध्ये सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

### जून अखेरपर्यंत सर्व प्रक्रिया पूर्ण

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे बारा स्थानकांपर्यंतचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. हे काम वेगाने पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणीसाठी या महिन्याच्या अखेरची तारीख देण्यात आली आहे. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्यात उपस्थित होणाऱ्या मुद्द्यांवर काम केले जाईल. मेट्रो मार्ग १२ स्थानकांपर्यंत खुला करण्याची सर्व प्रक्रिया जूनअखेरपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर जुलै महिन्यात मेट्रो सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती 'पीएमआरडीए'च्या मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी दिली.

# एमएनजीएलकडून प्लंबर्सना मोठी संधी!

## घरगुती पाईपलाईन जोडणी कामकाज करिता प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एम एन जी एल) कंपनीच्या वरिष्ठ अधिका-यांची आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या समवेत घरगुती पाईपलाईन जोडणी कामकाज संदर्भात नुकतीच बैठक घेण्यात झाली त्या बैठकीत कंपनीने कुशल मनुष्यबळ प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून याबाबत महापालिकेने सहकार्य करण्याबाबत विनंती केली होती.**



त्यानुसार अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली, महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मोरवाडी येथे उपरोक्त विषयांकित प्रकरणी एमएनजीएल यांच्या सहकार्यातून मार्गदर्शनपर कार्यक्रम व भरती मेळावा घेण्यात आला.यात संस्थेमधील प्लंबर या ट्रेडचे आजी व माजी विद्यार्थ्यांशी समक्ष संपर्क साधून त्यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य तथा विभागप्रमुख शशिकांत पाटील यांनी विषयास अनुसरून माहिती दिली व भविष्यातील करिअरच्या दृष्टीने सदरचे कामकाज महत्त्वाचे असलेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एमएनजीएल चे वरिष्ठ व्यवस्थापक वासुदेव गुरसाळी यांनी विद्यार्थ्यांना कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली तसेच प्लंबर्स इच्छुक असतील तर एम. एन. जी. एल. कडून त्यांना २ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल, प्रशिक्षणानंतर त्यांना अनुभवी प्लंबर्सच्या मार्गदर्शनाखाली साईटवर प्रत्यक्ष काम शिकवले जाईल तसेच भविष्यात सी जी डी कंपन्यांमध्ये कुशल प्लंबर्सची मागणी झपाट्याने वाढणार आहे, त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडलेले प्लंबर्स हे एम.एन.जी.एल.अधिकृत व्हेंडर्स अंतर्गत काम करतील. त्यांच्या कामाच्या कार्यक्षेत्रामध्ये एम.सी.व्ही. टू.इंस्टॉलेशन, मीटर इंस्टॉलेशन, कॉपर पाईपिंग आणि किचन कन्वर्जनचे काम समाविष्ट आहे.

मेहनत आणि प्रामाणिकपणाने काम केल्यास भविष्यात तुम्ही स्वतःचे उद्योजक (ENTREPRENEUR) देखील बनू शकता असे नमूद केले तसेच जॉब वर्कनुसार महिन्याला साधारण ७० हजार पेक्षा जास्त कमाई देखील करू शकतात असेही कळविले.

संस्थेतील साधारण ४० ते ५० प्लंबर विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करण्याची उत्सुकता दर्शविली असून संख्या अजून वाढणार आहे, त्यांनी सदर कार्यक्रम व भरती मेळावास निमंत्रित केल्याबद्दल संस्थेचे आभार मानले तसेच अजून प्लंबर्स इच्छुक असतील तर त्यांनी संस्थेस संपर्क साधावा असेही आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

एम.एन.जी.एल.यांच्यामार्फत उपप्रबंधक ओम उगले व उपप्रबंधक अमोल वैद्य यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाकरिता गटनिदेशक शर्मिला काराबळे, गटनिदेशक रवी ओव्हाळ, निदेशक किसन गावडे, निदेशक विक्रम काळोखे व निदेशक विशाल रेंगडे यांनी नियोजन केले होते.

## भरधाव दुचाकीची वृद्ध महिलेला धडक; उपचारादरम्यान मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**




चिंचवड परिसरात भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीने एका वृद्ध महिलेला जोरदार धडक दिल्याची घटना समोर आली आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. १३ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास रेलीश गार्डन रेस्टॉरंटसमोरील रोडवर, नोव्हेल स्कूल कंपाउंडजवळ घडली. मनुबाई प्रल्हाद साकळे (वय ७९) या रोड डिव्हायडरमधील झाडांना पाणी घालण्याचे काम करत होत्या. त्या जेवणाचा डबा आणि पाण्याची बाटली घेण्यासाठी रस्ता ओलांडत असताना थरमॅक्स चौकाकडून भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली.

एमएच १७ डीएफ ०७२२ क्रमांकाची मोटारसायकल आरोपी गोविंद दत्तात्रय म्हस्के (वय २५, रा. गोगलगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) हा चालवत होता. त्याने वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन चालवल्याचा आरोप आहे. अपघातात मनुबाई साकळे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी दिपक रवि जोगदंड (वय २०, रा. अजंठानगर, चिंचवड) यांनी दि २७ मे २६ रोजी फिर्याद दिली आहे. निगडी पोलिसांनी भा. न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(ब) अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपी अद्याप फरार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि दळवी करीत आहेत.

## फुगेवाडीत एकाच दिवशी पाच जणांचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दापोडी परिसरात गुरुवारी (२८ मे) एकाच दिवशी पाच जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विविध चर्चांना उधाण आले आहे.**



मृत्यू झालेल्या व्यक्तींविषयी परिसरात उलटसुलट चर्चा सुरू असून, काही नागरिकांकडून हे मृत्यू कथितरित्या दारू सेवनामुळे झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र, अधिकृतरीत्या याबाबत कोणतीही पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, मृतांपैकी दोघांच्या शवविच्छेदन अहवालात दारूचे अंश आढळून आले नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मृत्यूमागील नेमके कारण काय, याबाबत अधिक संभ्रम निर्माण झाला आहे. उर्वरित तिघांच्या शवविच्छेदन अहवालाबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही.

या घटनेनंतर परिसरात विविध तर्कवितर्क लावले जात असले तरी पोलिसांनी अद्याप कोणत्याही चर्चेला अधिकृत दुजोरा दिलेला नाही. संबंधित प्रकरणाचा तपास सुरू असून अधिकृत अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे सांगितले जात आहे.

### मृत झालेल्या व्यक्ति -

पांडुरंग सदाशिव फुगे वय 57 हे वयोवृद्ध असून नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार त्यांचा मृत्यू नैसर्गिक आहे.
विजय प्रकाश राठोड वय 31 वर्ष, राजेंद्र प्रकाश राठोड वय 34 हे दोन्ही सख्खे भाऊ असून विजय राठोड हा मुव्हर्स अँड पॅकर्स कंपनीत कामाला आहे.
राजेंद्र राजपूत व 51 वर्ष याचा मृत्यू बाथरूम मध्ये चक्कर येऊन पडल्याने झाले आहे.
अकबर पठाण 52 वर्ष त्याचा मृत्यू 12.30 वाजता झाला असून सदर इसम पंधरा वर्षांपासून दारू पिण्याचा सवयीचा आहे.



## भूमिका

**सर्वोच्च न्यायालयाने ‘सखोल मतदारसूची पुनर्सर्वेक्षण’ (एसआयआर) प्रक्रियेला घटनात्मक वैधता दिल्यानंतर मतदारसूची शुद्धीकरणाच्या मोहिमेला मोठे बळ मिळाले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने देशभर राबविलेल्या या अभियानामागे मतदारसूची अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वसनीय करण्याचा उद्देश आहे.**

# ‘शंका’सूरांचा कडेलोट



मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदार, एकाच ठिकाणी अनेक नोंदी किंवा बेकायदेशीर घुसखोरांची नावे मतदारसूचीत राहिल्यास लोकशाही प्रक्रियेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा अवैध नोंदी हटविणे ही लोकशाहीसाठी आवश्यक बाब मानली जाते.

लोकशाही व्यवस्थेचा पाया मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुकांवर उभा असतो. मतदान प्रक्रियेत बोगस मतदान किंवा अवैध मतदारांचा हस्तक्षेप वाढल्यास निवडणुकांवरील जनतेचा विश्वास कमी होण्याची शक्यता असते. म्हणूनच निवडणूक आयोगाने मतदारसूची शुद्धीकरणासाठी सुरू केलेले अभियान केवळ प्रशासकीय उपक्रम नसून लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयानेही आपल्या निर्णयातून याच भूमिकेला दुजोरा दिला आहे.

या प्रक्रियेला काही राजकीय पक्ष आणि संघटनांकडून विरोध करण्यात आला. मतदार नावे वगळण्याच्या प्रक्रियेत गैरप्रकार होऊ शकतात किंवा पात्र नागरिक वंचित राहू शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली. लोकशाहीत अशा शंका उपस्थित करणे चुकीचे नाही; मात्र त्याचवेळी निवडणूक प्रक्रियेची शुद्धता राखण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. न्यायालयाने या मोहिमेची घटनात्मक चौकट तपासल्यानंतरच तिला मान्यता दिली आहे, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.

भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात मतदारसूची अद्ययावत ठेवणे हे सतत चालणारे काम आहे. लोकसंख्येतील बदल, स्थलांतर, मृत्यू आणि अन्य कारणांमुळे मतदारसूचीत त्रुटी निर्माण होऊ शकतात. त्याचा गैरफायदा घेऊन बोगस मतदान झाल्यास निवडणुकांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. त्यामुळे निवडणूक आयोगाने तंत्रज्ञान, स्थानिक प्रशासन आणि पडताळणी यंत्रणांच्या मदतीने मतदारसूची अधिक काटेकोर बनविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

तथापि, या मोहिमेदरम्यान कोणताही वैध नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही, याचीही तितकीच काळजी घेतली पाहिजे. लोकशाहीत मतदानाचा अधिकार हा मूलभूत अधिकारांपैकी एक मानला जातो. त्यामुळे पारदर्शक प्रक्रिया, अपीलची संधी आणि प्रशासनाची जबाबदारी या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मतदारसूची शुद्धीकरण मोहिमेला कायदेशीर आणि नैतिक आधार मिळाला आहे. यामुळे लोकशाही प्रक्रिया अधिक सक्षम आणि विश्वासार्ह होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रासंगिक »

### लांडगा आणि मेंढी

**आपल्या सभोवतालच्या गोष्टींकडे लक्ष देण्याची ताकद आपल्या सर्वांना समजते. पण आपण आपल्या मुलांना तेच शिकवले पाहिजे.**

त्यांना त्यांच्या आजूबाजूला काय चालले आहे याची जाणीव असली पाहिजे. तसेच सभोवतालच्या घडामोडींविषयी सुद्धा त्यांनी जागरूक असले पाहिजे. खालील कथा सभोवताली लक्ष देणे महत्त्वाचे का आहे याचा धडा शिकवते. अस्वलाशी लढताना लांडगा गंभीर जखमी झाला होता. तो हालचाल करू शकत नव्हता आणि त्याची तहान किंवा भूक भागवू शकत नव्हता. एके दिवशी लांडगा जिथे लपला होता तिथून एक मेंढी जात होती. लांडग्याने त्याला हाक मारली, “मला पाणी आण. त्यामुळे मला जेवण्याची शक्ती मिळेल.” जेव्हा मेंढ्याने “जेवण” हा शब्द ऐकलं तेव्हा त्याला समजले की तो लांडगा फक्त त्याला खाण्याचा सापळा रचत होता.

तात्पर्य - जर कोणी लक्ष देत असेल तर एखाद्या व्यक्तीचे गुप्त हेतू शोधणे सोपे आहे. आपल्या आजूबाजूला काय घडत आहे ह्याविषयी आपण जागरूक राहिले पाहिजे आणि संभाव्य धोक्याकडे लक्ष दिले पाहिजे.

कांदा हा भारतीय स्वयंपाकघरातील अत्यावश्यक घटक असला, तरी तो पिकवणारा शेतकरी मात्र वर्षानुवर्षे आर्थिक अस्थिरतेचा सामना करत आहे. कधी भाव गगनाला भिडतात, तर कधी उत्पादन खर्चही निघत नाही.

# कांदा कधी हसवणार?

परिणामी, कांदा ग्राहकांना रडवतोच; पण शेतकऱ्यांनाही अधिक वेदना देतो. महाराष्ट्र हा देशातील सर्वात मोठा कांदा उत्पादक प्रदेश असल्याने या प्रश्नाची तीव्रता येथे अधिक जाणवते.

दरवर्षी कांद्याच्या दराचा प्रश्न निर्माण होतो. सरकार हमीभाव जाहीर करते, आंदोलने होतात, निर्यातबंदी लागू होते किंवा शिथिल केली जाते; मात्र शेतकऱ्यांच्या मूलभूत समस्या कायम राहतात. कारण धोरणे तात्पुरत्या उपायांपुरती मर्यादित राहतात. दीर्घकालीन नियोजनाचा अभाव हा या समस्येचा मुख्य मुद्दा आहे.

कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असताना साठवणुकीची अपुरी व्यवस्था शेतकऱ्यांना अडचणीत आणते. सरकार निर्णय घेईपर्यंत शेतकऱ्यांना आपला माल तातडीने विकावा लागतो. त्यामुळे मध्यस्थ आणि दलाल कमी भावात माल खरेदी करून नफा कमावतात, तर उत्पादकाला तोटाच सहन करावा



लागतो. आधुनिक कोल्ड स्टोरेज, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच यांचा अभाव ही गंभीर समस्या आहे.

कृषी अर्थशास्त्राचा परिणामही कांद्यावर स्पष्ट दिसतो. एखाद्या वर्षी चांगला भाव मिळाला की पुढील हंगामात अधिक शेतकरी कांद्याकडे वळतात. उत्पादन वाढल्याने बाजारात पुरवठा जास्त होतो आणि भाव कोसळतात. यामुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडतो. उत्पादन नियोजन आणि बाजार व्यवस्थापनातील समन्वयाचा अभाव यामुळे ही साखळी सतत सुरू राहते.

भारत हा जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश असून निर्यातीतही महत्त्वाची भूमिका बजावतो. तरीही कांदा उत्पादक शेतकरी स्थिर उत्पन्नापासून वंचित राहतो, ही शोकांतिका आहे. केवळ हमीभाव किंवा निर्यात धोरण बदलून हा प्रश्न सुटणार नाही. उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, प्रभावी खरेदी व्यवस्था, साठवणूक सुविधा आणि निर्यात धोरणातील सातत्य यांचा समावेश असलेले व्यापक धोरण आवश्यक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र वास्तवात अनेक शेतकरी अजूनही तोट्यात शेती करत आहेत. कांदा उत्पादकांच्या समस्या सोडवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी राजकारणापलीकडे जाऊन ठोस व दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा दरवर्षी कांद्याचा प्रश्न चर्चेत येईल, पण शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे हसू मात्र कायम दूरच राहील.

## ।। अभंगवाणी ।।



नाहीं काम माझें काज तुम्हांसवें ।
होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥

व्यभिचार माझा पडिला ठाउका ।
न सर ती लोकांमाजी जालें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# NEET परीक्षेमध्ये आता 'कूलर घोटाळा'!

## पेपरफुटीनंतर नागपुरात नव्या प्रकरणाने खळबळ; महाविद्यालये अडचणीत

महाईन्यूज । मुंबई

**नीट परीक्षेला २०१३ पासून सुरूवात झाल्यानंतर ही परीक्षा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. पेपरफुटीचा तसेच परीक्षेदरम्यान गैरप्रकार झाल्याचा आरोप अनेकदा करण्यात आला. त्यामुळे नीट परीक्षेतील पारदर्शकतेबाबत संशयाचे ढग निर्माण झाले आहेत. नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून यावर्षी घेण्यात आलेली परीक्षाच रद्द करण्यात आली आहे. मात्र तीन मे रोजी झालेली नीट परीक्षा पेपर फुटी मुळे गाजत असली तरी या परीक्षेत कूलर घोटाळा झाल्याचे नवीन आणि खळबळजनक प्रकरण समोर आले आहे.**



त्यानुसार परीक्षा केंद्र असणाऱ्या महाविद्यालयांनी कूलरची सुविधा केली. लग्नाचे दिवस असल्याने कूलर मिळणे अशक्य होते. त्यामुळे प्रति दिवस २००० ते अडीच हजार रुपये याप्रमाणे भाड्याने कूलर आणले. यानंतर प्रत्येक महाविद्यालयाचे कूलरचे भाडे ३० हजार ते ३५ हजार रुपये झाले आहे. या कूलरच्या भाड्याची देयके आणि न्यायालयाचा आदेश सोबत जोडण्यात आलेला आहे. मात्र परीक्षेचे व्यवस्था पाहणाऱ्या नीट च्या व्यवस्थापनाकडून परीक्षा केंद्र चालकांची देयके मंजूर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या कूलरच्या भाड्याचा भार परीक्षा केंद्रांवर पडलेला आहे. न्यायालयाच्या याचिकेमध्ये परीक्षा केंद्र यांना कुठलेही आदेश देण्यात आलेले नव्हते. कूलर लावण्याचे आदेश जिल्हाधिकारी आणि स्थानिक व्यवस्थापनाला देण्यात आले होते. आता या परीक्षा केंद्र असणाऱ्या महाविद्यालयांच्या कूलरच्या भाड्याची देयके नीट कडून काढून देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन देयके मंजूर करून द्यावी अशी मागणी होत आहे.

देशभरात तसेच महाराष्ट्रात नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण अत्यंत चर्चेचा विषय बनलेला आहे, ज्या बाबत केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत तपास सुरू आहे आणि काही आरोपींना अटकदेखील करण्यात आली आहे. मात्र परीक्षा गैरप्रकार, पेपरफुटी, कॉपी, बनावट उपस्थिती आणि निकालांमध्ये संशयास्पद हस्तक्षेप यांसारखे प्रकार केवळ नीट परीक्षेपुरते मर्यादित नसून महाराष्ट्रातील इतर अनेक स्पर्धा परीक्षा तसेच इयत्ता १०वी व १२वीच्या परीक्षांपर्यंत हे जाळे पोहोचल्याची गंभीर शंका निर्माण होत आहे. राज्यात अनेक खाजगी अकॅडमी आणि कोचिंग क्लासेस मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. काही ठिकाणी विद्यार्थी दिवसभर कोचिंग क्लासमध्ये शिकत असतानाही त्यांची उपस्थिती ग्रामीण भागातील किंवा नव्याने सुरू करण्यात आलेल्या शाळा/महाविद्यालयांमध्ये दर्शविली जाते. प्रत्यक्षात विद्यार्थी त्या शाळांमध्ये उपस्थित राहत नाहीत.

### 'कूलर घोटाळा' नेमका काय आहे?

१ मे महाराष्ट्र दिनाच्या दिवशी कलेक्टर नागपूर यांनी सर्व केंद्र प्रमुखांची बैठक घेतली. यावेळी सांगितले की उच्च न्यायालयाने स्वतःहून याचिका दाखल करून सर्व केंद्रात प्रत्येक खोलीत कूलर लावण्याची आज्ञा दिली. मात्र कूलरचा खर्च कोण देईल असा प्रश्न उपस्थित केला गेला. यावर शहरातील परीक्षेचे व्यवस्थापक आणि निवासी जिल्हाधिकारी यांनी नीटकडून रक्कम मागवून देऊ तुम्ही सोबत देयके जोडा अशा सूचना दिल्या होत्या.

# रुग्णवाहिकेस डिझेल न मिळाल्याने हिंगोली जिल्ह्यात नवजात बालकाचा मृत्यू

महाईन्यूज । नागपूर

**औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथे शासकीय रुग्णवाहिकेस डिझेल न मिळाल्याने एका नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र डिझेल न मिळण्याचे कारण नसून वाहन चालक उपलब्ध नव्हता असे कारण रुग्णालय प्रशासनाकडून दिले जात आहे. नालेगाव येथील सात महिन्याच्या गरोदर मनिषा इंगळे यांना प्रसुती वेदना होत असताना पाच किलोमीटर दुचाकीवरुन प्रवास करावा लागला. परिणामी त्यांचे नवजात मूल दगावले. हिंगोलीतील या घटनेमुळे आरोग्य व्यवस्था आणि दळणवळणातील इंधन तुटवड्याची भिषणता समोर आली आहे.**



नालेगाव येथील मनिषा इंगळे या सात महिन्यांच्या गरोदर होत्या. मंगळवारी अचानक त्यांना तीव्र पोटदुखी सुरू झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना दुचाकीवरून जवळाबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.

प्रसुती वेदना सुरू असताना पाच किलोमीटरचा दुचाकीवरुन करावा लागला. प्राथमिक तपासणीनंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तातडीने हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्याचा सल्ला दिला. यानंतर कुटुंबीयांनी १०२ आणि १०८ क्रमांकावर वारंवार संपर्क साधूनही तातडीची रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. वेळ न दवडता खासगी रुग्णवाहिकेच्या मदतीने महिलेला हिंगोली येथे हलविण्यात आले. मात्र तेथे सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर नवजात बालक मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी "वेळेवर रुग्णवाहिका मिळाली असती तर बाळाचा जीव वाचला असता," असा आरोप करत आरोग्य प्रशासनाच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले आहे. दुसरीकडे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांनी "रुग्णवाहिकेत डिझेल होते, मात्र चालक नव्हता. तसेच महिलेच्या गर्भाशयात अतिरिक्त पाणी साचल्याने गुंतागुंत निर्माण झाली होती," असे स्पष्टीकरण दिले.

दरम्यान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. या अनुषंगाने जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

### या मृत्यूला सरकार जबाबदार

या घटनेवरून विरोधकांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. या हत्येसाठी सरकार जबाबदार आहे, असं म्हणावं लागेल. कारण कुठेही इंधन तुटवडा नाही अशा घोषणा सरकारकडून केल्या जातात, अशा वेळेस हिंगोलीमध्ये ही घटना घडली आहे. फक्त रुग्णवाहिकेला तिथे इंधन मिळालं नाही, म्हणून आज एका मातेला तिचं बाळ गमवावं लागलं, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या रोहिणी खडसे यांनी निशाणा साधला.

# ओमानला ‘उडवून टाकू’चा इशारा

## इराण युद्ध थांबविण्याच्या हालचाली सुरू असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आक्रमक

**महाईन्यूज । अमेरिका**

**इराण युद्धाला आज (२८ फेब्रुवारी रोजी सुरुवात) तीन महिने पूर्ण होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून इराण युद्धातून तोडगा काढण्यासाठी शस्त्रसंधी लागू असून युद्ध थांबविण्यासाठीची चर्चा सुरू आहे. मात्र ही चर्चा अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चांगलेच संतापले आहेत. त्यांनी आक्रमक भाषा वापरण्यास सुरुवात केली असून थेट आपला मित्र देश असलेल्या ओमानला धमकी दिली आहे.**



होर्मुझच्या सामुद्रधुनीवर कुणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. मस्कटलाही (ओमानची राजधानी) तो अधिकार नाही, असे सांगून ट्रम्प यांनी मंत्रिमंडळ बैठकीत संताप व्यक्त केला. इराण आणि ओमान हे युद्ध समाप्तीनंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवतील, हा प्रस्ताव ट्रम्प यांनी धुडकावून लावला.

“होर्मुझवर कुणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. हा आंतरराष्ट्रीय जलमार्ग आहे. ओमाननेही इतर देशांप्रमाणेच वागायला हवे. अन्यथा आम्ही त्यांना उडवून टाकू”, असा इशारा ट्रम्प यांनी दिला. ट्रम्प यांच्या या ताज्या विधानामुळे अनेकांना धक्का बसला आहे. कारण ओमान हा देश गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेचा जुना आणि विश्वासू सहकारी मानला जात होता. ओमानमध्ये अमेरिकेच्या लष्करी सहकार्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच अमेरिका आणि इराणमध्ये मध्यस्थी म्हणूनही ओमान भूमिका बजावत होता.

अमेरिका-इस्रायल यांचे इराणविरोधातील युद्ध समाप्त करण्यासाठी होर्मुझची सामुद्रधुनी महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरत आहे. वर्षाच्या सुरुवातीला पश्चिम आशियातील युद्ध सुरू होण्यापूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगाला मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा होत होता.

डोनाल्ड ट्रम्प हे मुस्लीमबहुल देशांवर अब्राहम करारात सामील होण्यासाठी दबाव टाकत आहेत. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात मध्यस्थीने निर्माण झालेल्या या करारामुळे इस्रायल आणि यूएई व बहरीनसह अनेक अरब देशांमधील संबंध सामान्य झाले होते. ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, सौदी अरेबिया, कतार, पाकिस्तान, तुर्किये, इजिप्त आणि जॉर्डन यांनीही अधिकृतपणे या करारात सहभागी व्हायला हवे.

### व्हाईट हाऊसने इराणचा मसुदा नाकारला

दोन दिवसांपूर्वी इराण सरकारी माध्यमाने युद्ध समाप्तीच्या करारातील मसुदा प्रसिद्ध केला होता. ज्यात म्हटले होते की, होर्मुझवरील व्यावसायिक वाहतूक युद्धाच्या पूर्वीच्या टप्प्यावर महिन्याभरात जाईल. या मसुद्यात नमूद केल्यानुसार इराण आणि ओमान संयुक्तपणे होर्मुझमधील जहाजांची वाहतूक हाताळेल. तसेच सामंजस्य कराराचा भाग म्हणून अमेरिका इराणच्या बंदराजवळ लावलेला आपला लष्करी वेढा मागे घेईल. मात्र अमेरिकेने हा मसुदा फेटाळून लावला असून तो निराधार असल्याचे म्हटले. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, होर्मुझ हा आंतरराष्ट्रीय जलमार्ग असेल. आम्ही होर्मुझवर लक्ष ठेवून असू पण कुणीही या मार्गावर नियंत्रण लादू शकत नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

### अणुऊर्जा चर्चा रखडली

होर्मुझ सामुद्रधुनी आणि युद्धसमाप्तीव्यतिरिक्त इराणच्या अणु कार्यक्रमाची चर्चा दुसरा मोठा अडथळा ठरत आहे. इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीने जो मसुदा प्रसिद्ध केला त्यात कुठेही तेहरानच्या अणु कार्यक्रम कमी करण्याचा उल्लेख नाही. तर दुसऱ्या बाजूला अमेरिकेला मात्र त्यावर कडक निर्बंध लादायचे आहेत.

# कॅनडात २२ वर्षीय भारतीय विद्यार्थिनीची चाकूने भोसकून हत्या

**महाईन्यूज । कॅनडा**

**कॅनडामध्ये एका भारतीय विद्यार्थिनीची हत्या झाली आहे. विधी कल्पेशभाई मेघानी असं हत्या झालेल्या मुलीचं नाव आहे, ती मूळची गुजरातमधल्या आणंदमधल्या बोरसदची होती. विधी कॅनडातल्या नियाग्रा भागात राहात होती. निधी कॅनडामध्ये शिक्षण घेत होती आणि नोकरीही करत होती. पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आणि तपास सुरु केला आहे.**



समोर आलेल्या माहितीनुसार कॅनडामध्ये विधीची चाकूचे वार करुन हत्या करण्यात आली. विधीची हत्या का करण्यात आली? याचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. विधीच्या हत्येची बातमी समोर आल्यानंतर मेघानी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. १५ मे रोजी विधी मेघानी तिच्या नियाग्रातल्या तिच्या घरातून बाहेर पडली. त्यावेळी तिच्यावर चाकू हल्ला करण्यात आला. विधी रक्ताच्या थारोळ्यात पडली होती, तिला रुग्णालयात नेण्यात आलं, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. या प्रकरणी कॅनडा पोलीस आता विधीच्या हत्येचा तपास करत आहेत. पोलिसांनी या प्रकरणात एका आरोपीला अटक केली आहे. कॅनडातील पोलीस आता या आरोपीची चौकशी करत आहेत. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

कॅनडामध्ये भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर हल्ले होणं त्यांची हत्या होणं हे प्रकार सुरुच आहेत हे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केलं आहे. मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात ३० वर्षीय हिमांशी खुरानाची हत्या करण्यात आली. एप्रिल २०२५ मध्ये ओंटियारोमध्ये मूळ पंजाबची असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी हरसिमकर रंधावाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी ३२ वर्षीय आरोपीला अटक केली.

### विधी मेघानी हत्येमागचे कारण उघड?

- गुजरातच्या तरुणीची कॅनडामध्ये हत्या, विधी मेघानी असं मृत मुलीचं नाव आहे. ती २२ वर्षांची होती.
- विधी मूळची गुजरातच्या आणंदमधली होती.
- विधी मागच्या चार वर्षांपासून कॅनडातल्या नियाग्रामध्ये वास्तव्य करत होती.
- १५ मे रोजी विधी घराबाहेर पडली तेव्हा रस्त्यावर लुटीच्या उद्देशाने तिच्यावर चाकू हल्ला केला आणि तिच्यावर वार केले.
- विधी नियाग्रामध्ये शिक्षण घेत होती आणि नोकरीही करत होती.
- तसंच ही तरुणी पीआर अर्थात PERMANENT RESIDENCY साठीही तयारी करत होती.
- विधीच्या मृत्यूच्या बातमीनंतर मेघानी कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



# ‘घर स्मशानासारखं वाटतं’

नेहमी हसतमुख आणि बिनधास्त स्वभावासाठी ओळखली जाणारी राखी सावंत नुकतीच एका पॉडकास्टमध्ये भावूक झालेली पाहायला मिळाली. कॉमेडियन भारती सिंह आणि तिचे पती हर्ष लिंबाचिया यांच्या पॉडकास्टमध्ये राखीने तिच्या वैयक्तिक आयुष्यातील वेदना मोकळेपणाने व्यक्त केल्या. या दरम्यान तिला रडू कोसळल आणि तिचं बोलणं ऐकून भारती सिंहलाही अश्रू अनावर झाले. पॉडकास्टमध्ये बोलताना राखी म्हणाली, “मी खूप रडते. काल रात्रीही खूप रडले. मला विचारणारं कोणीच नाही की तू जेवलीस का नाही. आई जिवंत होती तेव्हा ती काळजी घ्यायची.” आईच्या आठवणीने राखी आणखी भावूक झाली. तिच्या आयुष्यातील एकटेपणाबद्दल बोलताना ती म्हणाली की, “घरही स्मशान घाटासारखं वाटतं, कारण तिथे विचारपूस करणारं कोणीच नाही.” राखीने तिच्या अपयशी वैवाहिक आयुष्याबद्दलही खुलासा केला. ती म्हणाली की आता पुन्हा लग्न करण्याची हिंमत होत नाही. “लोकांना पत्नी नको असते, ते फक्त माझा वापर करून पुढे जायचा प्रयत्न करतात. त्यामुळे आता कोणावर विश्वास ठेवावासा वाटत नाही,” असे ती म्हणाली. तिच्या आवाजातील वेदना स्पष्ट जाणवत होती. राखी सावंतच्या आयुष्यात दोन विवाह झाले, पण दोन्ही नात्यांचा शेवट विभक्त होण्यात झाला. २०१९ मध्ये तिने रितेश सिंहसोबत लग्न केलं होतं. मात्र २०२२ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला.


# अंकिता लोखंडे हिजाब घालण्यावरून ट्रोल

अभिनेत्री अंकिता लोखंडे सध्या पती विक्की जैनसोबत अबू धाबीमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत आहे आणि तिने तिथले अनेक फोटो सोशल मिडियावर शेअर केले आहेत. मात्र, हिजाब परिधान केल्यामुळे ती युजर्सच्या निशाण्यावर आली आहे. काही दिवसांपूर्वीच अंकिता गोसेवा करताना पाहायला मिळाली. ज्याचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी तिचे खूप कौतुक केले होते. पण आता हिजाब घालण्यावरून आणि मशिदीत फोटो काढल्यामुळे तिच्या धार्मिक श्रद्धेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अंकिता लोखंडेने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अबू धाबी व्हेकेशनचे फोटो शेअर करत लिहिले, ‘माझ्या कॅमेऱ्यातून थोडेसे अबू धाबीचे प्रेम एक्सप्लोर करत आहे, हसत आहे आणि आठवणी बनवत आहे.’ अंकिता आणि विक्कीने येथे ‘वंडर वुमन’पासून ते ‘वार्नर ब्रदर्स’च्या फन झोनसारख्या ठिकाणांना भेट दिली आणि फोटो काढले. परंतु, यावेळी अंकिता लोखंडेने जीन्स-टॉपवर हिजाब घातला आणि मशिदीत विक्की जैनसोबत फोटो काढले. यावरून नेटकऱ्यांनी तिच्यावर संताप व्यक्त केला आहे. एका युजरने लिहिले, ‘हिंदू नेहमी सेक्युलर (धर्मनिरपेक्ष) असण्याबद्दल बोलतात, पण मुस्लिम कधीच असे करत नाहीत.




# ‘लग्न करून नेमकं काय मिळवलं?

‘मोहब्बतें’ चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री शमिता शेट्टी सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. वाढत्या वयावरून आणि लग्न न केल्यामुळे ट्रोल करणाऱ्यांना तिने जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. तिच्या स्पष्ट आणि ठाम भूमिकेचं अनेकांकडून कौतुक होत आहे. शमिताने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एका यूजरची कमेंट शेअर केली. त्या व्यक्तीने तिच्या वयावर टीका करत, “तुझं वय झालं आहे, आधीसारखी राहिली नाहीस,” असा टोला लगावला होता. यावर शमिताने अतिशय शांत पण ठाम शब्दांत उत्तर दिलं. ती म्हणाली, “हो, मी बदलले आहे. वेळेनुसार प्रत्येक गोष्ट बदलते. हेच आयुष्याचं नैसर्गिक सत्य आहे. बाह्य सौंदर्य कायम राहत नाही. पण मी माझ्या वयानुसार फिट, हेल्दी आणि आनंदी आहे. देवाने दिलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल मी कृतज्ञ आहे.” याचसोबत काही जणांनी तिच्या सिंगल लाइफवरही प्रश्न उपस्थित केले. “वेळेवर लग्न केलं असतं तर आज मुलं मोठी झाली असती,” अशी कमेंट एका यूजरने केली. त्यावर शमिताने खणखणीत शब्दांत उत्तर देत विचारलं, “तुम्ही लग्न करून नेमकं काय उखाडलं आहे भाई?” तिच्या या उत्तराची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. शमिताने पुढे ट्रोलर्सना सुनावत म्हटलं की, “सिंगल महिलांना वयावरून कमी लेखणं, त्यांना टोमणे मारणं आणि जुनाट विचारसरणी लादणं थांबवा. जर माझं आयुष्य तुम्हाला इतकं खटकत असेल, तर मला फॉलो करणंच बंद करा.” अनेक चाहत्यांनी शमिताच्या या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. महिलांनी लग्न, वय किंवा समाजाच्या ठराविक चौकटीतच जगावं, ही मानसिकता आता बदलायला हवी, अशा प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत. स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे, हे शमिताने आपल्या उत्तरातून ठामपणे दाखवून दिलं.



# ईदनिमित्त सलमान खानचे सरप्राइज!

अभिनेता सलमान खानच्या आगामी ‘मातृभूमी’ या चित्रपटाची अपडेट समोर आली आहे. ईदच्या खास दिवशी त्याच्या या सिनेमाचं ‘मैं हूं’ हे गाणं प्रदर्शित झाले आहे. सलमान खानने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर आगामी सिनेमाच्या गाण्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओत सलमान खानसोबत चित्रांगदा सिंह दिसत आहे. ब्लॅक अँड व्हाईटमधीलहे एक भावनिक गाणं आहे. याशिवाय सलमान खानने या सिनेमातील गाण्याचा टीझर रिलीज केला आहे. गाण्याचा टीझर शेअर करत त्यानं खास कॅप्शन दिलं आहे. सलमान खानने व्हिडीओ शेअर करत कॅप्शनमध्ये, ‘Om ooom..Main hooon’ असं लिहिलं आहे. या गाण्याला प्रेक्षकांकडून पसंती मिळत आहे. अनेकांनी कमेंट सेक्शनमध्ये ‘ईद मुबारक भाईजान’ असं म्हणत शुभेच्छा दिल्या आहेत. ‘मैं हूं’ या गाण्याच्या ओरिजनल वर्जनमध्ये एका सैनिकाच्या परिवाराचा प्रवास दाखवण्यात आला आहे. या गाण्यात आनंदाचे क्षण आणि जोडीदारापासून दूर जाण्याचे दु:ख देखील दाखवण्यात आलंय. हे गाणं श्रेया घोषाल आणि अयानलाल यांनी गायले आहे. हे गाणे पाहिल्यानंतर सलमानचे चाहतेही भावुक झाले आहेत. या गाण्यामुळे ‘मातृभूमी’ या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. सलमान खानच्या दमदार अभिनयासोबतच चित्रांगदा सिंहची भावनिक भूमिका देखील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. गाण्यातील संगीत, भावपूर्ण शब्द आणि ब्लॅक अँड व्हाईट सिनेमॅटोग्राफीमुळे चाहत्यांनी या गाण्याचे भरभरून कौतुक केले आहे. देशभक्ती, प्रेम आणि कुटुंबीयांच्या भावनांचा सुंदर संगम या गाण्यात पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर ‘मैं हूं’ हे गाणं ट्रेंड होत असून चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात शेअर केले जात आहे. सलमान खानच्या या नव्या अंदाजाने पुन्हा एकदा चाहत्यांची मनं जिंकली आहेत. आता ‘मातृभूमी’ चित्रपटाच्या ट्रेलर आणि प्रदर्शनाची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली आहे.



# हरमनप्रीत सिंग पुन्हा कर्णधार

## प्रो लीगच्या युरोपियन टप्प्यात, भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्व

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**हॉकी विश्वचषकाच्या तयारीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा असलेल्या प्रो लीगच्या युरोपियन टप्प्यात, भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्व करण्यासाठी हरमनप्रीत सिंग पुन्हा सज्ज झाला आहे. कर्णधार आणि आघाडीचा 'ड्रॅग-फ्लिकर' हरमनप्रीत सिंग याने बुधवारी, पुढील महिन्यात होणाऱ्या प्रो लीगच्या युरोपियन टप्प्यासाठीच्या 24 सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्व करण्यासाठी पुनरागमन केले.**

ऑगस्टमध्ये होणाऱ्या विश्वचषकापूर्वीची ही एक अत्यंत महत्त्वाची सराव स्पर्धा ठरणार आहे.

वैयक्तिक कारणांमुळे हरमनप्रीतने फेब्रुवारीमध्ये झालेल्या प्रो लीगच्या होबार्ट टप्प्यात सहभाग घेतला नव्हता. भारतीय संघ सर्वप्रथम 7 ते 9 जून या कालावधीत सराव आणि एका मैत्रीपूर्ण सामन्यासाठी ब्रुसेल्सला रवाना होईल. प्रो लीगचे वेळापत्रक आणि प्रतिस्पर्धी संघ या संक्षिप्त शिबिरानंतर, संघ 10 जूनपासून नेदरलँड्समधील रॉटरडॅम येथे दाखल होईल. तिथे 14 ते 21 जून या कालावधीत जर्मनी आणि नेदरलँड्सविरुद्ध प्रो लीगचे सामने खेळले जातील. त्यानंतर, भारतीय संघ लंडनला रवाना होईल, जिथे 23 ते 28 जून या काळात प्रो लीगमध्ये त्यांचा सामना पाकिस्तान आणि इंग्लंड या संघांशी होईल.

संघाची रचना आणि प्रमुख खेळाडू 15 ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या विश्वचषकासाठी संघाचा गाभा अधिक मजबूत करण्याच्या



उद्देशाने, या संघात अनुभवी दिग्गज आणि युवा प्रतिभावान खेळाडूंचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे. भारताचा कर्णधार आणि बचावफळीचा मुख्य आधार असलेल्या हरमनप्रीतला, अमित रोहिदास, जरमनप्रीत सिंग, जुगराज सिंग आणि युवा बचावपटू अमनदीप लाक्रा यांचा समावेश असलेल्या एका भक्कम बचावफळीची साथ लाभेल.




# सचिन तेंडुलकरच्या पोस्टवर वैभव सूर्यवंशीची मन जिंकणारी प्रतिक्रिया

**महाईन्यूज । नवी दिल्ली**



**भारताचा युवा खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर काय करु शकतो, हे १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने जगाला दाखवून दिलं आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील एलिमिनेटरचा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. पहिल्या चेंडूपासून वैभवने तुफान फटकेबाजी केली.**

यादरम्यान त्याच्याकडे सर्वात जलद शतक झळकावण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली. वैभवने आपल्या फटकेबाजीने क्रिकेटच्या देवालाही भुरळ घातली आहे. या खेळीनंतर सचिन तेंडुलकरने वैभव सूर्यवंशीचं कौतुक करणारी पोस्ट शेअर केली. या पोस्टवर वैभव सूर्यवंशीने आपली प्रतिक्रिया दिली आहे.

सचिनने आपल्या एक्स अकाऊंटवर वैभवचं कौतुक करणारी पोस्ट शेअर केली होती. सचिनने लिहिले, "वैभव सूर्यवंशीचा बॅट स्विंग कमालीचा आहे. त्याहूनही खास गोष्ट म्हणजे, लेग साइडला येणाऱ्या चेंडूवर तो ज्या सुंदर पद्धतीने फ्रंट फुट बाजूला काढून स्वतःसाठी जागा तयार करतो, ते पाहण्यासारखं आहे. त्यामुळे त्याला स्वतःचा नैसर्गिक खेळ खेळण्याचं स्वातंत्र्य मिळतं. त्याची ही खेळी खरोखरच थक्क करणारी होती!"

सचिनने कौतुक केल्यानंतर आता वैभव सूर्यवंशीने आपली प्रतिक्रिया दिली आहे. सचिनने आपली खेळी पाहून कौतुक केलं आहे, याबाबत वैभवला काहीच कल्पना नव्हती. हा सामना झाल्यानंतर आयपीएलच्या संकेतस्थळासाठी ध्रुव जुरेलसोबत चर्चा करत असताना, कोणीतरी त्याला सचिनच्या पोस्टबद्दल सांगितले. तेव्हा कुठे वैभव सूर्यवंशीला याची कल्पना आली.

वैभव सूर्यवंशीच्या या दमदार खेळीची सध्या क्रिकेटविश्वात जोरदार चर्चा रंगली आहे. अल्पवयात दाखवलेला आत्मविश्वास आणि आक्रमक फलंदाजीमुळे त्याने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. मैदानात त्याने खेळलेले भन्नाट फटके पाहून प्रेक्षकही अक्षरशः भारावून गेले होते. अनेक माजी क्रिकेटपटूंनीही वैभवच्या खेळीचे सोशल मीडियावर कौतुक केले आहे. आयपीएलसारख्या मोठ्या मंचावर इतक्या शांतपणे आणि निर्भीडपणे खेळणे हे त्याच्या मोठ्या क्षमतेचे संकेत मानले जात आहेत. सचिन तेंडुलकरसारख्या दिग्गज क्रिकेटपटूकडून मिळालेलं कौतुक वैभवसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.

## वैभव सूर्यवंशीला सुखद धक्का बसला

सचिन तेंडुलकरने आपलं कौतुक केलं आहे, हे ऐकून वैभव सूर्यवंशीला सुखद धक्का बसला. ज्यांना आपण क्रिकेटचा देव मानतो, त्यांच्याकडून अशी दाद मिळणे हा अत्यंत अभिमानाचा आणि मनाला प्रचंड प्रेरणा देणारा क्षण आहे, असं वैभव म्हणाला. वैभव म्हणाला, "सर, हे ऐकून खरोखर खूप चांगलं वाटलं. यामुळे मला आणखी चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते. तुम्हीच मला याबद्दल सांगितलं, मला तर माहितच नव्हतं. अर्थातच, ते क्रिकेटचे देव आहेत, हे संपूर्ण जगाला माहीत आहे. जर त्यांनी अशी काहीतरी पोस्ट शेअर केली असेल, तर आमच्यासारख्या नवोदीत खेळाडूंसाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. त्यांच्यासारख्या दिग्गजांनी माझी दखल घेतली, हा माझ्यासाठी खूप अभिमानाचा क्षण आहे."

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। शुक्रवार ।
दि. 29 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मेट्रोच्या कामात हलगर्जीपणा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**भक्ती शक्ती उड्डाणपूलाखाली श्रीकृष्ण मंदिर ते निगडी गावठाण–मुंबई-पुणे महामार्ग परिसरात सुरू असलेल्या मेट्रो रेल्वेच्या कामादरम्यान जेसीबी मशीनद्वारे खोदकाम करत असताना पाणीपुरवठ्याची मुख्य पाईपलाईन फुटल्याची घटना घडली.**

या घटनेत हजारो लिटर पाणी वाया गेले असून, परिसरातील पाणीपुरवठा काही काळासाठी बंद ठेवावा लागला. परिणामी नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.

या घटनेचा फटका निगडी गावठाण, यमुनानगर, साईनाथनगर, लक्ष्मीनगर आदी भागांतील नागरिकांना बसला. अचानक पाणीपुरवठा खंडित झाल्याने घरगुती वापरासह व्यापारी व दैनंदिन कामांवर परिणाम झाला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची टंचाई अधिक तीव्र होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.


दरम्यान, भाजपा नगरसेविका

> निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वेच्या कामादरम्यान वारंवार पाणी पाईपलाईन फुटण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी.
>
> – अर्चना अक्षय करांडे, नगरसेविका, पिं. चिं. मनपा.

अर्चना करांडे आणि सामाजिक कार्यकर्ते अक्षय करांडे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे संबंधित मेट्रो रेल्वे ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

नागरिकांनीही मेट्रो प्रकल्पाच्या कामांदरम्यान सुरक्षिततेच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, पाणी व इतर नागरी सुविधा अबाधित राहतील याची जबाबदारी ठेकेदारांवर निश्चित करावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे मेट्रो कामांच्या नियोजन व अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



# हाऊसिंग फेडरेशनची आयुक्तांसोबत बैठक

## CCTV, ॲप-आधारित रिक्षा-कॅब मुजोरी व वाहतूक कोंडीवर तातडीचे निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील कायदा-सुव्यवस्था, नागरिकांची सुरक्षा आणि वाढती वाहतूक कोंडी या गंभीर प्रश्नांवर पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ (PCCHSF) आणि पोलीस प्रशासन यांच्यात नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महासंघाचे अध्यक्ष सचिन लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलीस आयुक्त विनय चोबे यांची भेट घेऊन विविध नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा केली.**



या बैठकीस महासंघाचे सचिव सचिन गुणाले, कोषाध्यक्ष प्रदीप घोरपडे, संचालक अरुण देशमुख, रोहित सावंत व वैभव चौधरी उपस्थित होते. पोलीस प्रशासनाच्या वतीने अप्पर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड आणि बसवराज तेली यांनी सहभाग घेतला.

यावेळी शहरातील स्मार्ट सिटी अंतर्गत बसवण्यात आलेल्या CCTV नेटवर्कबाबत गंभीर बाबी मांडण्यात आल्या. शहरातील सुमारे ३,३०० कॅमेऱ्यांपैकी जवळपास २,५०० कॅमेरे निगडी येथील एकात्मिक नियंत्रण व कमांड सेंटर (ICCC) शी जोडलेले नसल्याचे निदर्शनास आणण्यात आले. अनेक कॅमेरे वीजबिल न भरल्यामुळे बंद असल्याने दाट लोकवस्तीच्या भागात नागरिकांची, विशेषतः महिला व ज्येष्ठांची सुरक्षा धोक्यात आली आहे. यावर पोलीस आयुक्तांनी तातडीने कंत्राटदार व तांत्रिक यंत्रणांशी समन्वय साधून सर्व कॅमेरे कार्यान्वित करण्याचे आदेश दिले.

ॲप-आधारित रिक्षा व कॅब चालकांकडून अतिरिक्त भाडे मागणे, प्रवास अर्ध्यावर सोडणे, मीटरप्रमाणे पैसे देण्याची सक्ती यासारख्या तक्रारींवरही चर्चा झाली. यावर पोलीस आयुक्तांनी रिक्षा संघटना, RTO, वाहतूक पोलीस आणि संबंधित कंपन्यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करण्याचा निर्णय घेतला. प्रवाशांसाठी 'प्रवासी सन्मान आचारसंहिता' लागू करण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेतली.

ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू असलेल्या विशेष पोलीस ॲपबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. या ॲपची माहिती सोसायट्यांमध्ये जाऊन देण्यासाठी जनजागृती मोहीम राबवण्याचे आश्वासन पोलीस आयुक्तांनी दिले.

### हिंजवडी आयटी पार्क व वाहतूक कोंडीवर उपाय

शहरातील सिग्नल चौकांवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सिग्नलपासून ५० ते १०० मीटर परिसरात 'नो-पार्किंग झोन' लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर तातडीने राबवण्याचे आदेश वाहतूक विभागाला देण्यात आले. तसेच हिंजवडी आयटी पार्कमधील अपूर्ण रस्ते व वाहतूक सुधारणा कामांमुळे होणाऱ्या दैनंदिन कोंडीबाबत महासंघाने लक्ष वेधले. यावर पोलीस आयुक्तांनी वाहतूक शाखेला आयटी पार्क प्रशासनाशी समन्वय साधून प्रलंबित उपाययोजनांचा आढावा घेण्याचे आदेश दिले.

"पिंपरी चिंचवडच्या नागरिकांची सुरक्षा व वाहतूक सुलभता हे आमचे प्राधान्य आहे. झालेल्या बैठकीत पोलीस आयुक्तांनी घेतलेले निर्णय स्वागतार्ह असून महासंघ प्रशासनाकडे सातत्याने याबाबत पाठपुरावा करेल. पिंपरी-चिंचवड सुरक्षित व शिस्तबद्ध शहर बनवण्यासाठी आम्ही जबाबदारीने काम करत राहू, पोलीस प्रशासनाचे आभार".

**- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ**

# त्याग आणि समर्पणाची बकरी ईद सण पिंपरी चिंचवड शहरात उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**बकरी ईद ( ईद-उल-अजहा) इस्लाम धर्मात मोठा सण आहे. रमजान ईद नंतर साधारणपणे 70 दिवसांनी हा सण येतो . या सणाला बलिदानाचा सण म्हणूनही ओळखले जाते. याची सुरुवात प्रेषित इब्राहिम यांच्या अल्लाह वरील अपार श्रद्धेच्या कथेतून होते. प्रेषित इब्राहिम यांच्या अजोड त्यागाच्या आणि समर्पणाच्या भावनेची आठवण म्हणून जगभरातील मुस्लिम बांधव बकरी ईद साजरी करतात.**



बकरी ईदचा मुख्य संदेश हा सण केवळ कुर्बानी पुरताच मर्यादित नाही, तर तो स्वतःतील अहंकार , वाईट विचार आणि स्वार्थाचा त्याग करण्याचा संदेश देतो. अल्लाहच्या इच्छेपुढे स्वतःच्या आवडी निवडी समर्पित करणे आणि समाजातील गरीब, गरजूंना आपल्या आनंदात सामावून घेणे ही या सणाची मूळ शिकवण आहे .

आज पिंपरी चिंचवड शहरात बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. पिंपरी चिंचवड शहरातील मुस्लिम बांधव आज सकाळी नवीन कपडे परिधान करून सुवासिक तेल , अत्तर कपड्याना लावून आपल्या मुलासमवेत परीसरातील जवळच्या मदरसा ,मसीद , ईदगाह मैदानात एकत्र जमले . मौलानानी सकाळी पावणे सात ते साडेआठ दरम्यान विविध ठिकाणी प्रवचन देवून सामुदायिक नमाज पढविला . ईद निमित्त पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरातील विविध भागातील मशीदी , ईदगाह मैदान , आदी ठिकाणी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला . मुस्लीम बाधवानी ईदच्या नमाज पठनानंतर एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुले महिलांनी घरोघरी नमाज पठण केले . समाज बाधव , मित्र, नातेवाईकांनी मुस्लीम बाधवाना मोबाईल वरती ईदच्या शुभेच्छा दिल्या .

नेहरूनगर येथील पिंपरी चिंचवड मुस्लिम वेल्फेअर अँड कब्रस्तान ईदगाह कमीटीच्या वतीने मुस्लिम बांधवांनी सामुदायीक नमाज पठण केले . अध्यक्ष जैनूद्दीन शेख , मुबीन बादशहा , मीरा साहब तरसगार, डॉ . बीलाल मुजावर आदीनी संयोजन केले . नेहरूगर येथील तवकल्ला जामा मशीदीत मौलाना अबूकलाम अशरदी यानी नमाज पढविला . संयोजन नजीर तरसगार , शकुर कुरेशी , मुनाफ तरसगार आदीनी केले . चिंचवड स्टेशन येथील जामिया गौशिया मशिदीत मौलाना फैज अहमद फैज शेख यांनी नमाज पढविला. नमाज पटनानंतर मुस्लिम बांधवांनी ज्येष्ठ नेते व आझम पानसरे यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मशिदीचे अध्यक्ष झिंशाग सय्यद, माजी नगरसेवक अस्लम शेख, निहाल पानसरे , सादिक पठाण नबीन पानसरे, जफर सय्यद आदी उपस्थित होते. संत तुकाराम नगर येथील सामाजिक कार्यकर्ते शकरूल्ला पठाण यांनी ईद निमित्त पिंपरी येथील सावली निवारा केंद्रातील निराधार, वंचित, ज्येष्ठ नागरिकांना फळे वाटप केले .

### मुस्लीम बांधवाना ईदच्या शुभेच्छा दिल्या

चिंचवडगाव येथील जमातुल मुस्लेमिन शाही ईदगाह मैदानावर मौल्लाना मिनाज उद्दीन व मौल्लाना कमरूल यांनी नमाज पढविला . यावेळी आलमगीर शाही मशिदीच्या वतीने अध्यक्ष इमरान पानसरे, अख्तर पिंजारी , सहाय्यकआदींनी पिंपरी चिंचवड शहरातील पोलीस विभागाचे डी. सी.पी. संदीप आटोळे , सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत जाधव याचा मुस्लीम बांधवाच्या वतीने सत्कार करण्यात आला . चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलामअली भालदार यानी मुस्लीम बांधवाना ईदच्या शुभेच्छा दिल्या .

# डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची ऐतिहासिक कामगिरी

## पुण्यात पहिली 'रोबोटिक-आसिस्टेड' हृदय शस्त्रक्रिया यशस्वी; वैद्यकीय क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पुण्यातील वैद्यकीय क्षेत्रात एक मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी झाली आहे. पिंपरी येथील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने पुण्यात पहिली अत्याधुनिक रोबोटिक पद्धतीने हृदयाच्या झडपेची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. पारंपारिक ओपन-हार्ट सर्जरीला (Open-Heart Surgery) हा एक सुरक्षित, जलद आणि आधुनिक पर्याय ठरला आहे.**



पिंपरी-चिंचवड येथील एका ४६ वर्षीय महिलेला 'रुमॅटिक हार्ट डिसीज' (Rheumatic Heart Disease – RHD) म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे तर हृदयाच्या झडपांना (व्हॉल्व्हला) होणारा आजार झाला होता, ज्यामुळे त्यांच्या हृदयाचा मिट्रल व्हॉल्व्ह म्हणजे 'रक्तप्रवाह नियंत्रित करणारा पडदा खराब झाला होता. हा व्हॉल्व्ह बदलण्यासाठी शस्त्रक्रियेची गरज होती.

पारंपारिक पद्धतीनुसार, अशा शस्त्रक्रियेसाठी छातीचे हाड (Breastbone) मधोमध कापून 'ओपन-हार्ट सर्जरी' करावी लागते. यामध्ये रुग्णाला खूप जास्त वेदना होतात, बरे होण्यास अनेक महिने लागतात आणि छातीवर मोठी जखम (डाग) राहते.

पारंपारिक पद्धतीला फाटा देत डीपीयूच्या डॉक्टरांनी या शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला. यामध्ये छातीचे मुख्य हाड न कापता, बरगड्यांच्या मधून लहान छिद्र पाडून ही शस्त्रक्रिया अत्यंत सुरक्षितपणे पार पाडण्यात आली. हाडांना कोणतीही इजा न झाल्यामुळे पारंपारिक ओपन-हार्ट सर्जरीच्या तुलनेत रुग्णाचा त्रास आणि वेदना खूपच कमी झाल्या. या आधुनिक उपचार पद्धतीमुळे रुग्णामध्ये अतिशय जलद सुधारणा झाली आणि ती अवघ्या काही दिवसांतच स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभी राहिली. या शस्त्रक्रियेनंतर छातीवर कोणताही मोठा किंवा विद्रूप डाग राहिला नाही, एकंदरीत, कमीत कमी त्रासाच्या या सुरक्षित उपचारामुळे रुग्ण अवघ्या अवघ्या दोन आठवड्यांतच आपल्या नेहमीच्या कामावर परतणे सहज शक्य झाले. "डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या हृदय शस्त्रक्रिया विभागातील तज्ज्ञ शल्यचिकित्सक डॉ. आशिष बाविस्कर यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात पहिली ऐतिहासिक रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय वेगाने सुधारली. शस्त्रक्रियेनंतर दुसऱ्याच दिवशी रुग्ण स्वतःहून चालण्या-बोलण्यास आणि दैनंदिन हालचाली करण्यास सक्षम झाला. तिसऱ्या दिवशी रुग्णाने हॉस्पिटलच्या जिममधील पुनर्वसन (Rehabilitation) सुविधेतही सहभाग घेतला. महिन्यांऐवजी अवघ्या काही दिवसांतच रुग्ण पूर्णपणे निरोगी व्यक्तीसारखा धावपळ करू लागला.

या यशाबद्दल बोलताना डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी शल्यचिकित्सक डॉ. आशिष बाविस्कर म्हणाले, "भविष्यात हृदय शस्त्रक्रिया याच पद्धतीने केल्या जातील. रोबोटिक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे आता हृदय शस्त्रक्रियेचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या पद्धतीमुळे अत्यंत बारकाईने आणि अचूकपणे काम करता येते. रुग्णाच्या शरीरावर कमीत कमी जखमा होतात, ज्यामुळे तो वेगाने बरा होतो आणि लवकर घरी जाऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, रुग्णाला त्याच्या नेहमीच्या दिनक्रमात लवकर परतणे सोपे होते.

> "पुण्यातील पहिली अत्याधुनिक रोबोटिक पद्धतीने करण्यात आलेली हृदयाच्या झडपेची शस्त्रक्रिया यशस्वी करणे हा आमच्यासाठी एक अभिमानाचा टप्पा आहे. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने नेहमीच अत्याधुनिक नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि वैद्यकीय उत्कृष्टतेचा मेळ घालून रुग्णांना सुरक्षित आणि जागतिक दर्जाचे उपचार देण्यासाठी कटिबद्ध आहे."
>
> - डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.

### भविष्यात हृदय शस्त्रक्रिया याच पद्धतीने केल्या जातील

या यशाबद्दल बोलताना डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी शल्यचिकित्सक डॉ. आशिष बाविस्कर म्हणाले, "भविष्यात हृदय शस्त्रक्रिया याच पद्धतीने केल्या जातील. रोबोटिक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे आता हृदय शस्त्रक्रियेचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या पद्धतीमुळे अत्यंत बारकाईने आणि अचूकपणे काम करता येते. रुग्णाच्या शरीरावर कमीत कमी जखमा होतात, ज्यामुळे तो वेगाने बरा होतो आणि लवकर घरी जाऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, रुग्णाला त्याच्या नेहमीच्या दिनक्रमात लवकर परतणे सोपे होते. जी शस्त्रक्रिया पूर्वी खूप अवघड आणि कठीण वाटायची, ती आता आपण अधिक सुरक्षितपणे, खात्रीशीरपणे आणि अचूकपणे करू शकत आहोत."

# एमआयटी एसीएससी कॉलेजची जागतिक पातळीवर मोठी कामगिरी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**एमएईईआरच्या एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी ने जागतिक स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत WURI 2026 – World University Rankings for Innovation मध्ये तीन प्रतिष्ठित विभागांत 'ग्लोबल टॉप 100' मध्ये स्थान मिळविले आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, नवोपक्रम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे.**



महाविद्यालयाने "Curricular Innovation for Future-Readiness (C3)" या विभागात जगात दुसरा क्रमांक पटकावला आहे. "Policy to Practice: Building Employability and Innovation through NEP" हा उपक्रम डॉ. शीतल घोटेकर यांनी सादर केला होता.

तसेच "University Brand and Reputation (B8)" या विभागात महाविद्यालयाला जागतिक स्तरावर 32 वा क्रमांक मिळाला. "Strategic Branding for Recognition, Reputation, and Rankings" हा उपक्रम डॉ. मानसी अतीतकर यांनी मांडला.


"Visionary Leadership (B1)" या विभागात महाविद्यालयाने जागतिक स्तरावर 33 वा क्रमांक मिळविला. "Transformative Leadership Ecosystem: Building Tomorrow's University" हा उपक्रम प्रा. अभिजित नेटके यांनी सादर केला.

WURI (World University Rankings for Innovation) ही संस्था जगभरातील विद्यापीठांचे नवोपक्रम, भविष्योन्मुख शिक्षण, सामाजिक परिणामकारकता आणि परिवर्तनशील शैक्षणिक कार्य यांच्या आधारे मूल्यमापन करते. जगभरातील हजारो विद्यापीठांमधून 'टॉप 100' मध्ये स्थान मिळविणे ही अत्यंत अभिमानाची बाब मानली जाते.

या यशामागे महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. बी. बी. वाफरे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राध्यापकांचे संशोधन व शैक्षणिक योगदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समर्पित कार्य, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच व्यवस्थापन मंडळाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

### 'Curricular Innovation'मध्ये जागतिक स्तरावर दुसरा क्रमांक

विशेष म्हणजे "Curricular Innovation" विभागात मिळालेला जागतिक दुसरा क्रमांक हा राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) आधारित, उद्योगाभिमुख आणि सर्वांगीण अभ्यासक्रमाच्या यशाची जागतिक पातळीवरील पावती मानली जात आहे. महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. शीतल घोटेकर, डॉ. मानसी अतीतकर आणि प्रा. अभिजित नेटके यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in